# DR. DHANAJI G. BAGAL

M.D.(HOM)

Phone no:-9930209097/9082342073 | Email:-drbag@yahoo.com

DEAN
Faculty – Homoeopathy
Maharashtra University of Health Science
Nashik.

VICE-PRINCIPAL
Professor & HOD-Repertory
Dr.G.D.Pol Foundation YMTHMC
Kharghar, Navi Mumbai.


Ref. No -95/2020

Date:- 05/ 08/2020

प्रति,
मा.प्राचार्य
सर्व संलग्नित होमिओपॅथीक महाविद्यालये,
महाराष्ट्र, राज्य

विषयः- कोव्हीड-१९ (COVID-19) सुरक्षा कवच योजनेबाबत...

संदर्भः- विद्यापीठ परिपत्रक क्र-मआविवि/एसडब्ल्यू/८००/२०२० दि. ०३/०८/२०२०

महोदय/महोदया,

सद्यस्थितीत राज्यामध्ये कोरोना विषाणू (COVID-19) संसर्गाने होणारा "कोव्हीड-१९" या संसर्गजन्य अशा गंभीर आजाराच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर विषाणूंचा प्रादुर्भाव अजुन पुढील काही काळ राहण्याची शक्यता असुन विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची तसेच शैक्षणिक कामकाजाशी निगडीत संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, नियमित शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठाचे विविध प्राधिकरणांचे सदस्य व विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विषयांकीत योजना संदर्भीय परीपत्रकानुसार दि. १०/०७/२०२० पासून लागू करण्यात येत आहे.

सदर योजनेकरिता विद्यापीठामध्ये परिक्षा विभाग व शैक्षणिक विभाग यांचेकडे सतत पाठपुरावा केल्यानंतर आदरणीय कुलगुरु डॉ.म्हैसेकर सर व आदणीय कुलसचिव डॉ.के.डी.चव्हाण सर यांनी सदर योजना आमलात आणण्याकरीता अधिसभा व विद्यापरिषदेमध्ये विषय ठेवून मंजूरी घेतली त्याबाबत मी त्यांचा होमिओपॅथी शाखेच्या वतीने आभारी आहे.

सदर योजना ही संलग्नित महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू असून सदर योजनेअंतर्गत खालीलप्रमाणे अर्थसहाय्य आहे.

अ) सदर योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यास कोरोना विषाणूंच्या संसर्गामुळे कोव्हीड-१९ आजार झाल्यास सदर आजाराच्या उपचाराकरीता येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम किंवा जास्तीत जास्त रुपये १ लक्ष (रुपये एक लक्ष) यापैकी जी रक्कम कमी असेल अशा रक्कमेचे अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

# DR. DHANAJI G. BAGAL

M.D.(HOM)

Phone no:-9930209097/9082342073 Email:-drbag@yahoo.com

DEAN
Faculty – Homoeopathy
Maharashtra University of Health Science
Nashik.

VICE-PRINCIPAL
Professor & HOD-Repertory
Dr.G.D.Pol Foundation YMTHMC
Kharghar, Navi Mumbai.

Ref. No - 95/2020 Date:- 05/ 08/2020

ब) कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे कोव्हीड-१९ या आजारामुळे सदर योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्याचा दुर्देवाने मृत्यू झाल्यास मयताच्या कुटूंबीयांना /वारसांना रुपये ३ लक्ष (रुपये तीन लक्ष) एकरक्कमी व एकवेळची बाब म्हणून भरपाईची रक्कम अनुज्ञेय असेल.

सदर योजनेचे खालीलप्रमाणे लाभार्थी असतीलः-

अ) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात व मान्यताप्राप्त संस्थेत विहित प्रक्रियेव्दारे प्रवेशीत व नियमित शिक्षण घेणारे विद्यार्थी

ब) विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२० सत्राच्या परीक्षेकरीताचे परीक्षार्थी विद्यार्थी

क) विद्यापीठाशी शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ करीता सर्व विद्याशाखांतर्गत संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील तात्पुरती/नियमित मान्यताप्राप्त शिक्षक व नियमित स्वरुपात नियुक्त व कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचारी

ड) विद्यापीठाच्या विविध नियमित प्राधिकरणांचे सदस्य

इ) विद्यापीठाच्या आस्थापनेवर शासन मंजूर पदांवर व विद्यापीठ निधीतून तात्पुरत्या स्वरुपात निर्माण केलेल्या पदांवर नियुक्त व कार्यरत शिक्षक,अधिकारी,कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्य

फ) उपरोक्त अ ते इ मधील लाभार्थ्यांच्या कोव्हीड-१९ आजारामुळे मृत्युप्रकरणी त्यांचे कुटुंबीय/वारस

मी आपणास विनंती करतो की, सदर योजनेचा पूर्ण अभ्यास करुन गरजूंना त्याचा जास्तीत जास्त लाभ मिळेल अशा प्रकारची माहिती आपण महाविद्यालय स्तरावर प्रसिद्ध करावी व सदर बाबत काही अडचणी आल्यास मार्गदर्शनासाठी आपण मला कधीही संपर्क करु शकता.

धन्यवाद

डॉ.डी.जी.बागल
अधिष्ठाता
होमि. विद्याशाखा

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK
दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
EPABX: 0253-2539100-300, Phone: 0253-2539173,174
Website : www.muhs.ac.in, E-mail : sw@muhs.ac.in

MUHS

डॉ. कालिदास द. चव्हाण
एम.बी.बी.एस., एम.डी. (न्यायवैद्यकशास्त्र)
कुलसचिव

Dr. Kalidas D. Chavan
M.B.B.S. M.D. (Forensic Medicine)
Registrar

मआविवि/एसडब्ल्यू/ ८०० /२०२०    दि. ०३/०८/२०२०

परिपत्रक क्र. ९९ /२०२०

प्रति,
मा. अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
म.आ.वि.वि. नाशिक.

**विषय :- कोव्हीड-१९ (COVID-19) सुरक्षा कवच योजनेबाबत...**

महोदय/महोदया,

सद्यस्थितीत राज्यामध्ये कोरोना विषाणू (COVID-19) संसर्गाने होणारा "कोव्हीड-१९" या संसर्गजन्य अशा गंभीर आजाराच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. अशा परिस्थितीमध्ये सदर विषाणूंचा प्रादुर्भाव अजुन पुढील काही काळ राहण्याची शक्यता असुन विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची तसेच शैक्षणिक कामकाजाशी निगडीत संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, नियमित शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठाचे विविध प्राधिकरणांचे सदस्य व विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी विषयांकीत योजना दि. १०/०७/२०२० पासुन लागू करण्यात येत आहे.

सदर योजनेची नियमावली या परिपत्रकान्वये प्रख्यापित करण्यात येत आहे.

कुलसचिव

प्रत माहितीस्तव :-
१) मा. कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक.
२) मा. प्रति कुलगुरु कार्यालय, मआविवि, नाशिक.
३) मा. कुलसचिव कार्यालय, मआविवि, नाशिक.
४) सर्व विभाग प्रमुख, मआविवि, नाशिक.

टिप :- वर नमुद योजनेची नियमावली विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेत स्थळावर **Department→ Student Welfare→ Circular No. ........./2020** उपलब्ध आहे.

C:\Users\sw3.MUHS\Desktop\COVID-19.doc

MUHS

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ

म्हसरुळ, वणी-दिंडोरी रोड, नाशिक ४२२००४

## कोव्हीड-१९ (COVID-19) सुरक्षा कवच योजना नियमावली,२०२०

-: अनुक्रमणिका :-



| | |
|---|---|
| १) | संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ |
| २) | व्याख्या |
| ३) | योजनेचा उद्देश |
| ४) | योजनेंतर्गतचे अर्थसहाय्य |
| ५) | योजनेचे लाभार्थी |
| ६) | योजनेचा लाभ घेण्याकरीता आवश्यक दस्तऐवज |
| ७) | प्रस्तावांची छाननी व प्रस्तावावरील कार्यवाही |
| ८) | योजनेचा कालावधी |
| ९) | अर्थसंकल्पीय तरतुद |
| १०) | संकीर्ण तरतुदी |

## १) संक्षिप्त नांव, व्याप्ती व प्रारंभ

(१.१) सदर नियमावलीस "**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कोव्हीड-१९ (COVID-19) सुरक्षा कवच योजना,२०२०**" असे संबोधण्यात येईल.

(१.२) सदर नियमावलीस महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केल्याच्या दिनांकापासुन लागु असल्याचे मानण्यात येईल.

(१.३) सदर नियमावली महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयात व मान्यताप्राप्त संस्थेत शिक्षण घेणारे नियमित विद्यार्थी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांचे सदस्य, संलग्नीत सर्व महाविद्यालयात व मान्यताप्राप्त संस्थेत कार्यरत नियमित किंवा तात्पुरत्या स्वरुपात मान्यताप्राप्त शिक्षक, नियमित शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच, विद्यापीठाच्या आस्थापनेवरील नियमित व तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त व कार्यरत अधिकारी / कर्मचारी व त्यांचे कुटुंबातील सदस्यांना लागू असेल.

## २) व्याख्या

(२.१) "कोव्हीड-१९" (COVID-19) म्हणजे कोरोना विषाणुंच्या संसर्गाने होणारा कोव्हीड-१९ हा आजार होय.

(२.२) "विद्यापीठ" म्हणजे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ चे कलम ३ अन्वये स्थापन झालेले "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ" होय.

(२.३) "विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी" म्हणजे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या आस्थापनेवरील शासन मंजुर पदांवर नियुक्त व कार्यरत अधिकारी व कर्मचारी तसेच, विद्यापीठाने कलम ९(२)(ई)(एक) अंतर्गत निर्माण केलेल्या सावधी पदांवर नियुक्त व कार्यरत शिक्षक, अधिकारी व कर्मचारी होय.

(२.४) "प्राधिकरणांचे सदस्य" म्हणजे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ चे कलम २२ मध्ये विहित केलेल्या प्राधिकरणांचे सदस्य.

(२.५) "कुटुंब" म्हणजे विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सेवापुस्तकात नोंद असलेल्या त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती होय.

(२.६) सदर नियमावलीमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मध्ये विषद केलेल्या सज्ञेंचा अर्थ उक्त नियमावलीस जसाच्या तसा लागू असेल.

## ३) योजनेचा उद्देश

सद्यपरिस्थितीत राज्यात कारोना विषाणुंच्या संसर्गाने होणारा "कोव्हीड-१९" या संसर्गजन्य अशा गंभीर आजाराच्या रुग्णसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. अशा परिस्थितीत संबंधीत केंद्रीय परिषदांचे निर्देश व मा. कुलपती व राज्य शासनाच्या परवानगीनुसार विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त संस्थेतील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या उन्हाळी-२०२० सत्राची परीक्षा घेणे प्रस्तावित आहे. तसेच, सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे शैक्षणिक सत्र सुरु करणे देखील प्रस्तावित आहे. सदर विषाणुंचा प्रादुर्भाव अजुन पुढील काही काळ राहण्याची शक्यता विचारात घेऊन विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात नियमित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची तसचे परीक्षार्थीच्या आरोग्याची महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ चे कलम ५(पी)(पी) अंतर्गत काळजी घेण्यासाठी तसेच, परीक्षेच्या व नियमित शैक्षणिक कामकाजाशी निगडीत संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांचे सदस्य व कलम ५(क्यु) अंतर्गत विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सदर योजना तयार करण्यात आलेली आहे.

## ४) योजनेंतर्गतचे अर्थसहाय्य

(४.१) सदर योजनेंतर्गतच्या पात्र लाभार्थ्यास कोरोना विषाणुंच्या संसर्गामुळे कोव्हीड-१९ आजार झाल्यास सदर आजाराच्या उपचाराकरीता येणाऱ्या प्रत्यक्ष खर्चाची रक्कम किंवा जास्तीत जास्त रुपये १ लक्ष (रुपये एक लक्ष) यापैकी जी रक्कम कमी असेल अशा रक्कमेचे अर्थसहाय्य अनुज्ञेय असेल.

(४.२) सदर योजनेंतर्गतच्या पात्र लाभार्थ्याचा वैद्यकीय विमा असल्यास व सदर विम्यातंर्गत असा लाभार्थी कोव्हीड-१९ या आजाराचा उपचार घेत / घेतला असल्यास उपचाराच्या रक्कमेचे अर्थसहाय्य विद्यापीठातर्फे अनुज्ञेय नसेल.

(४.३) कारोना विषाणुंच्या संसर्गामुळे कोव्हीड-१९ या आजारामुळे सदर योजनेंतर्गतच्या पात्र लाभार्थ्याचा दुर्देवाने मृत्यु झाल्यास मयताच्या कुटुंबीयांना / वारसांना रुपये ३ लक्ष (रुपये तीन लक्ष) एकरक्कमी व एकवेळेची बाब म्हणुन भरपाईची रक्कम अनुज्ञेय असेल.

(४.४) कोव्हीड-१९ या आजारामुळे मृत्यु झालेल्या रुग्णाच्या कुटुंबीयांना / वारसांना ईतर कुठल्याही विमा कंपनीकडुन/आस्थापनेकडुन/शासनाकडुन भरपाईची रक्कम मिळणार/ मिळाली असेल तरी त्याव्यतिरिक्त विद्यापीठाकडुन भरपाईची रक्कम अनुज्ञेय असेल.

(४.५) कारोना विषाणुंच्या संसर्गामुळे होणाऱ्या कोव्हीड-१९ या आजाराच्या उपचाराच्या खर्चाकरीता व रुग्णाचा दुर्देवी मृत्यु झाल्यास भरपाई देण्याकरीता "महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ कोव्हीड-१९ (COVID-19) सुरक्षा कवच योजना,२०२०" ही स्वतंत्र योजना लागू करण्यात आल्यामुळे सदर आजाराकरीता विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्याला विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागांतर्गत असलेली संजीवनी सुरक्षा योजना लागू नसेल.

## ५) योजनेचे लाभार्थी

(५.१) सदर योजनेचे खालील प्रमाणे लाभार्थी असतीलः-

(अ) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात व मान्यताप्राप्त संस्थेत विहित प्रक्रियेद्वारे प्रवेशीत व नियमित शिक्षण घेणारे विद्यार्थी;

(ब) विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२० सत्राच्या परीक्षेकरीताचे परीक्षार्थी विद्यार्थी;

(क) विद्यापीठाशी शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ करीता सर्व विद्याशाखांतर्गत संलग्नीत असलेल्या सर्व महाविद्यालयातील / मान्यताप्राप्त संस्थेतील तात्पुरती / नियमित मान्यताप्राप्त शिक्षक व नियमित स्वरुपात नियुक्त व कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचारी;

(ड) विद्यापीठाच्या विविध नियमित प्राधिकरणांचे सदस्य ;

(इ) विद्यापीठाच्या आस्थापनेवर शासन मंजुर पदांवर व विद्यापीठ निधीतुन तात्पुरत्या स्वरुपात निर्माण केलेल्या पदांवर नियुक्त व कार्यरत शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्य ;

(फ) उपरोक्त "अ" ते "इ" मधील लाभार्थ्यांच्या कोव्हीड-१९ आजारामुळे मृत्युप्रकरणी त्याचे कुटुंबीय / वारस.

(५.२) सदर योजनेकरीता लाभार्थी म्हणुन खालील प्रमाणे अपवाद असेल / लाभार्थी असणार नाहीत.

(अ) शासनाच्या मिडलेव्हल सर्व्हीस प्रोव्हायडर अभ्यासक्रमाकरीता संलग्नीत शासकीय रुग्णालयातील डॉक्टर्स / कर्मचारी;

(ब) शासनाच्या मिडलेव्हल सर्व्हीस प्रोव्हायडर अभ्यासक्रमास प्रवेशित शिक्षण घेणारे / परीक्षार्थी वैद्यकीय व्यावसाईक;

(क) होमिओपॅथीच्या वैद्यकीय व्यावसायींकरीता शासनाने सुरु केलेल्या मॉडर्न फार्माकोलॉजी या अभ्यासक्रमास प्रवेशित / शिक्षण घेणारे / परीक्षार्थी वैद्यकीय व्यावसाईक;

(ड) संलग्नीत महाविद्यालयांव्यतिरिक्त फेलोशिप व प्रमाणपत्र अभ्यासक्रमाकरीता मान्यताप्राप्त संस्थांमधील मार्गदर्शक / डॉक्टर्स / कर्मचारी व फेलोशिप / प्रमाणपत्र अभ्यासक्रमास प्रवेशित वैद्यकीय व्यावसाईक;

(इ) कोव्हीड-१९ आजार होण्याच्या दिनांकापुर्वी सदस्यत्वाचा कालावधी / सदस्यत्व संपुष्टात आलेले विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांचे सदस्य.

(फ) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांच्या रुग्णालयातील रुग्णालयीन अधिकारी / कर्मचारी.

## ६) योजनेचा लाभ घेण्याकरीता आवश्यक दस्तऐवज

(६.१) सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता विद्यापीठाने विहित केलेल्या नमुन्यात अर्ज सादर करणे व त्यासोबत आवश्यक त्या विहित केलेल्या सर्व दस्तऐवजांच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक असेल.

(६.२) कोव्हीड-१९ या आजाराच्या उपचाराकरीताच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीकरीता विहित नमुन्यातील अर्जासोबत खालील प्रमाणे मुळ दस्तऐवज (ज्यावर रुग्णालयाचा शिक्का, उपचार करणाऱ्या डॉक्टरांचे नांव व नोंदणी क्रमांकाचा शिक्का व स्वाक्षरी प्रत्येक दस्तावर आवश्यक) जोडुन विद्यापीठास उपचार संपल्याच्या / डिसचार्जचे दिनांकापासुन तीन महिन्यांचे कालावधीत विद्यापीठास परीपुर्ण प्रस्ताव सादर करणे आवश्यक असेल.

(अ) कोव्हीड-१९ / कोरोना विषाणु संसर्गाच्या चाचणीच्या मुळ अहवाल;

(ब) कोव्हीड-१९ या आजाराच्या उपचाराकरीता रुग्णालयात दाखल झाल्यापासुन तें डिसचार्जचे कालावधीतील विविध वैद्यकीय चाचण्यांचे मुळ अहवाल सदर चाचण्यांची मुळ देयके / पावत्या, औषधांचे मुळ प्रिस्किप्शनस् व मुळ देयके / पावत्या;

(क) विहित नमुन्यातील नोटरी केलेले हमीपत्र.

(ड) अद्ययावत आधारकार्डची छायांकीत स्वाक्षांकित प्रत.

(६.३) कोव्हीड-१९ या आजाराचे उपचारादरम्यान / कोव्हीड-१९ या आजारामुळे दुर्देवी मृत्यु झाल्यास भरपाईच्या विहित नमुन्यातील अर्जासोबत खालील प्रमाणे मुळ दस्तऐवज जोडुन मृत्युच्या दिनांकापासुन तीन महिन्यांचे कालावधीत परिपुर्ण प्रस्ताव विद्यापीठास सादर करणे आवश्यक असेल.

(अ) कोव्हीड-१९ / कारोना विषाणुंच्या संसर्गाच्या चाचणीच्या अहवालाची मुळ प्रत / उपचार करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याच्या शिक्क्यासह स्वाक्षरी असलेली छायांकीत प्रत;

(ब) कोव्हीड आजारामुळे मृत्यु झाल्याची नोंद असलेले वैद्यकीय अधिकाऱ्याने / यथोचित प्राधिकाऱ्याने दिलेले मुळ प्रमाणपत्र व मुळ मृत्युचा दाखला;

(क) मृत्युपुर्वी रुग्णाने कोव्हीड-१९ या आजारामुळे ज्या रुग्णालयात उपचार घेतले असल्यास तेथील चाचण्यांचे अहवाल, औषधांचे मुळ प्रिस्किप्शनस् वगैरे दस्तऐवजांच्या साक्षांकित छायाप्रती;

(ड) विहित नमुन्यातील नोटरी केलेले हमीपत्र.

(इ) अद्ययावत आधारकार्डची छायांकीत स्वाक्षांकित प्रत.

## ७) प्रस्तावांची छाननी व प्रस्तावावरील कार्यवाही

(७.१) विद्यापीठास विहित नमुन्यात प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची प्राथमिक छाननी विभाग स्तरावर करण्यात येऊन परीपुर्ण प्रस्ताव सदर योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनाकरीता व शिफारशीस्तव गठीत खालील समितीसमोर सादर करण्यात येतील.

सदर समितीचे गठण खालील प्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| अ) | कुलगुरु | अध्यक्ष |
| ब) | प्रति-कुलगुरु | सदस्य |
| क) | कुलसचिव | सदस्य |
| ड) | वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ई) | विधी अधिकारी | सदस्य |
| फ) | वैद्यकीय अधिकारी, आरोग्य केंद्र | सदस्य |
| ग) | संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग | सदस्य सचिव |

कुलगुरु यांच्या अनुपस्थित प्रति-कुलगुरु हे सदर समितीचे अध्यक्ष असतील.

विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थेतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सदर समितीच्या बैठकीस विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग हे आमंत्रित सदस्य असतील. विद्यापीठाच्या आस्थापनेवर शासन मंजुर पदांवर / विद्यापीठ निधीतुन निर्माण कलेल्या पदांवर कार्यरत शिक्षक / अधिकारी / कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सदर समितीच्या बैठकीस विभाग प्रमुख, आस्थापना विभाग हे आमंत्रित सदस्य असतील. विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या सदस्यांच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सदर समितीच्या बैठकीस विभाग प्रमुख, प्रशासन विभाग हे आमंत्रित सदस्य असतील.

(७.२) कोव्हीड-१९ या आजाराबाबत प्राप्त होणाऱ्या परीपुर्ण प्रस्तावांची विभाग स्तरावर प्राथमिक छाननी खालील प्रमाणे विभाग करतील:-

| | | |
|---|---|---|
| अ) | विद्यार्थ्यांचे प्रस्ताव | विद्यार्थी कल्याण विभाग |
| ब) | विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्थेतील शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव | शैक्षणिक विभाग |
| क) | विद्यापीठाच्या आस्थापनेवर शासन मंजुर पदांवर / विद्यापीठ निधीतुन निर्माण कलेल्या पदांवर कार्यरत शिक्षक / अधिकारी / कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचे प्रस्ताव | आस्थापना विभाग |
| ड) | विद्यापीठाच्या प्राधिकरणांच्या सदस्यांचे प्रस्ताव | प्रशासन विभाग |

(७.३) सदर योजनेंतर्गत प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांची विभाग स्तरावर छाननी प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाल्यापासून दहा दिवसांत पुर्ण करण्यात येईल. छाननी दरम्यान प्रस्तावात काही त्रुटी आढळुन आल्यास अशा त्रुटींच्या पुर्ततेकरीता संबंधीत विभाग संबंधीत महाविद्यालयास कळवेल. प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव परीपुर्ण आढळुन आल्यास असा प्रस्ताव उपरोक्त गठित समितीसमोर सादर करण्यात येईल. सदर समितीने घेतलेला निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

(७.४) समितीने प्रस्तावास मान्यता प्रदान केल्यानंतर प्रस्ताव व समितीच्या मंजुरीचा ठराव प्रमाणकासह व आवश्यक दस्तऐवजांसह पडताळणी व प्रतिपुर्ती / भरपाईची रक्कम धनादेश / धनाकर्ष किंवा ईलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर प्रणालीद्वारे संबंधिताच्या खात्यात जमा करण्याकरीता संबंधीत विभागामार्फत विद्यापीठाच्या वित्त व लेखा अधिकारी यांना अग्रेषित करण्यात यईल.

(७.५) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या प्रस्तावांबाबत विलंबाच्या कारणांची योग्य ती पडताळणी करुन विलंबीमाफीचा निर्णय घेण्याचा अधिकार विद्यापीठाच्या कुलगुरुंना असेल.

## ८) योजनेचा कालावधी

(८.१) सदर योजनेचा कालावधी प्रथमतः व्यवस्थापन परिषदेने मान्यता प्रदान केल्यापासुन एक वर्षाच्या कालावधीकरीता असेल.

(८.२) सदर कालावधीत कोरोना विषाणुंच्या संसर्गास प्रतिबंध झालेला नसल्यास सदर योजना पुढील यथोचित कालावधीकरीता वाढविण्याकरीता / सुरु ठेवण्याकरीता विद्यापीठाची व्यवस्थापन परिषद यथोचित निर्णय घेईल.

## ९) अर्थसंकल्पीय तरतुद

(९.१) सदर योजनेकरीता विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभाग, शैक्षणिक विभाग, आस्थापना विभाग व प्रशासन विभागांतर्गत स्वतंत्र नविन लेखाशिर्ष निर्माण करुन त्याअंतर्गत आवश्यक तेवढया रक्कमांची तरतुद यथोचित प्राधिकरणांच्या मान्यतेने करण्यात यईल.

(९.२) अशाप्रकारे नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या कुठल्याही लेखाशिर्षातर्गत आर्थिक तरतुदीच्या रक्कमेपैकी सदर योजना सुरु झाल्यापासुन प्रथम सहा महिन्यांचे कालावधीत अर्धी रक्कम खर्च झाल्यास यथोचित विमा कंपनीमार्फत कोव्हीड सुरक्षा विमा काढण्याबाबतचा यथोचित निर्णय घेण्याचा अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेस असेल.

## १०) संकीर्ण तरतुदी

(१०.१) कोव्हीड-१९ या आजाराच्या रुग्णास सदर योजनेंतर्गत वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची विहित मर्यादेपर्यंत प्रतिपुर्ती व मृत्यु झाल्यास भरपाईची रक्कम अनुज्ञेय असेल.

(१०.२) कोव्हीड-१९ या आजारामुळे मृत्यु झालेल्या रुग्णाच्या वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती उक्त योजनेव्यतिरिक्त संबंधीतास अनुज्ञेय / लागू असलेल्या इतर योजनेंतर्गत / विम्यांतर्गत घेता येऊ शकते. परंतु अशा प्रकरणी ह्या योजनेंतर्गत वैद्यकीय उपचाराच्या खर्चाची प्रतिपुर्ती अनुज्ञेय नसेल.

(१०.३) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयातील नियमित शिक्षण घेणारा विद्यार्थी किंवा उन्हाळी २०२० सत्राचा परीक्षार्थी विद्यार्थी याचा कोव्हीड-१९ या आजाराच्या उपचाराच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीचा किंवा सदर आजारामुळे दुर्दैवी मृत्यु झाल्यास भरपाईचा प्रस्ताव संबंधीत विद्यार्थी ज्या महाविद्यालयात प्रवेशित असेल त्या महाविद्यालयाच्या / मान्यताप्राप्त संस्थेच्या अधिष्ठाता / संचालक / प्राचार्य यांची स्वाक्षरी असलेल्या शिर्षपत्रासोबत विद्यापीठास विहित मुदतीत सादर करणे आवश्यक असेल.

(१०.४) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थेमध्ये / नियमित / तात्पुरती मान्यताप्राप्त शिक्षक कर्मचारी, नियमित स्वरुपात नियुक्त व कार्यरत शिक्षकेत्तर कर्मचारी व प्राधिकरणाचा सदस्य यांचा कोव्हीड-१९ या आजाराच्या उपचाराच्या खर्चाच्या प्रतिपुर्तीचा किंवा सदर आजारामुळे दुर्दैवी मृत्यु झाल्यास भरपाईचा प्रस्ताव संबंधीत शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचारी / प्राधिकरणाचा सदस्य ज्या महाविद्यालयात कार्यरत असेल त्या महाविद्यालयाच्या/मान्यताप्राप्त संस्थेच्या अधिष्ठाता/संचालक / प्राचार्य यांची स्वाक्षरी असलेल्या शिर्षपत्रासोबत विद्यापीठास विहित मुदतीत सादर करणे आवश्यक असेल.

(१०.५) जे प्राधिकरण सदस्य विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थेत कार्यरत नसतील अशा सदस्यांचा प्रस्ताव परस्पर संबंधीत सदस्यांने किंवा त्यांचे कुटुंबीय / वारसांनी विद्यापीठास सादर करावा.

(१०.६) प्रस्तावासोबत सादर केलेल्या दस्तऐवजांमध्ये किंवा माहितीमध्ये कालांतराने कोणतेही दस्त किंवा माहिती बनावट अथवा खोटी असल्याचे आढळुन आल्यास संबंधीतांकडुन प्रतिपुर्ती / भरपाईची रक्कम वसुल करण्याचा व त्याचबरोबर संबंधीतांवर कायदेशीर कारवाई आणि / किंवा शिस्तभंगाची कारवाई करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(१०.७) सदर योजनेंतर्गत लाभ घेतांना संबंधीत लाभार्थ्याने सादर केलेला प्रस्ताव व त्यासोबतचे दस्तऐवज त्यांच्या सत्यतेकरीता तो वैयक्तीक जबाबदार असेल. तसेच, प्रस्तावाच्या सत्यता पडताळणीची जबाबदारी लाभार्थ्याबरोबरच तो ज्या संलग्नीत महाविद्यालयात / मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेशित / कार्यरत असेल त्या महाविद्यालय / संस्थेच्या अधिष्ठता / संचालक / प्राचार्य यांची देखील असेल.

(१०.८) सदर योजनेकरीता उक्त नियमावलीत विहित नियमांव्यतीरिक्त विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या / करण्यात येणाऱ्या अटी व शर्ती लागू असतील व अशा अटी व शर्ती उक्त नियमावलीचा भाग समजण्यात येईल.

(१०.९) सदर योजनेंतर्गत सादर कलेला प्रस्ताव अपुर्ण असल्यास किंवा निर्धारीत मुदतीनंतर प्राप्त झाल्यास असा प्रस्ताव नाकारण्याचा विद्यापीठास पुर्ण अधिकार असेल.

(१०.१०) सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना देण्यात येणारी प्रतिपुर्ती / भरपाई हे विद्यापीठाच्या स्वनिधीतुन देण्यात येणारी एक अतिरिक्त सवलत असल्यामुळे सदर योजनेचा लाभ हा कुणाचाही हक्क असणार नाही. तसेच, सदर योजना कुठल्याही स्तरावर कोणतीही पुर्वसुचना न देता बंद करण्याचा विद्यापीठास अधिकार असेल.

(१०.११) सदर योजनेंतर्गत अतिरिक्त नियम ठरविणे, नियमांत बदल / सुधारणा करणे, नियम रद्द करणे व नियमांचा अर्थ लावण्याचा अधिकार विद्यापीठाच्या कुलगुरुंना असेल.

व्यवस्थापन परिषदेच्या ठराव क्र. ८३ दि. १०/०७/२०२० नुसार निर्गमित.

दिनांकः- १० जुलै २०२०

ठिकाणः- नाशिक

कुलसचिव

(डॉ. कालीदास द. चव्हाण)